# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**

## अधिसभा निवडणूकीसाठी नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूक सूचनेसंदर्भातील स्पष्टीकरण

**जाहीर प्रकटन**

संदर्भ क्र. १ : साफुपुविनि/१२, दिनांक १३ जून, २०२२
संदर्भ क्र. २ : महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १(८)
संदर्भ क्र. ३ : साफुपुविनि/८३, दिनांक ०७ सप्टेंबर, २०२२
संदर्भ क्र. ४ : साफुपुविनि/९९, दिनांक ३० सप्टेंबर, २०२२
संदर्भ क्र. ५ : निवडणूक सूचना - साफुपुविनि/२८(२)(न)/१२०, दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(न)[(28(2)(t)] व कलम १३१ मधील तरतुदीनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे दहा (१०) नोंदणीकृत पदवीधर (**Registered Graduates**) अधिसभेवर (**Senate**) निवडून द्यावयाचे आहेत.

याकरिता संदर्भ क्र.५ अन्वये निवडणूक सूचना जारी करण्यात आली आहे. सदर निवडणूक सूचनेमधील पान क्र.३ वरील मुद्दा क्र.६(४) संदर्भात खालील प्रमाणे अधिकचे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

सदर निवडणूक सूचनेमधील पान क्र.३ वरील मुद्दा क्र.६(४) मध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(२)(न) [28(2)(t)] मध्ये नमूद केल्यानुसार अध्यापक (नियमित/कंत्राटी), प्राचार्य, विभागप्रमुख, व्यवस्थापन या प्रवर्गातील किंवा या पोटकलमामध्ये नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रवर्गात समावेश नसल्याबाबत तसेच संलग्नित महाविद्यालय, संस्था, मान्यताप्राप्त परिसंस्थेचा पदाधिकारी/विश्वस्त नसल्याबाबतचे नामनिर्देशन पत्रासोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील हमीपत्र याचा अर्थ **"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(२)(न) [28(2)(t)] व महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल, २०१७ मध्ये नमूद केलेल्या नोंदणीकृत पदवीधर या प्रवर्गाखेरीज महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२) मध्ये नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रवर्गात माझा समावेश नसल्याबाबतचे विहीत नमुन्यातील हमीपत्र जोडणे आवश्यक आहे''**, असा होतो.

सदर स्पष्टीकरणाची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

(डॉ.प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/१२४
दिनांक : ३१/१०/२०२२